महाराष्ट्र शासन

क्रमांक: एमजीसी ३५८५/८८६५/विशि-२
शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २० एप्रिल, १९८५.

प्रति,

कुलसचिव,
मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

विषय :- १९८५-८६ या शैक्षणिक वर्षापासून शारिरीक शिक्षण महाविद्यालयांना (बी.पी.एड.कॉलेज) परवानगी देण्याबाबत....

महोदय,

१९८५-८६ या वर्षापासून नवीन शारिरीक शिक्षण महाविद्यालय सुरु करण्या-करिता मराठवाडा विद्यापीठ अधिनियम ४३(४) नुसार विद्यापीठामार्फत शासनाकडे प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करुन इंदीरा शिक्षण प्रसारक मंडळ, हाटोदा, ता. उदगीर या संस्थेस १९८५-८६ पासून उदगीर येथे नवीन शारिरीक शिक्षण महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्याचे शासनाने ठरविले आहे. त्यानुसार मराठवाडा विद्यापीठ अधिनियमांच्या कलम ४३(४) व (५) अन्वये विद्यापीठाचे अर्जावर पुढील कार्यवाही करण्यास मराठवाडा विद्यापीठास शासन परवानगी देत आहे.

२. शासनाचे संलग्नीकरणाकरिता वर दिलेली परवानगी ही पुढील अटीवरच आहे :-

१) १९८४-८५ या शैक्षणिक वर्षाकरीता प्रस्तावित शारिरीक शिक्षण महाविद्यालय, मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नीत राहील. विद्यापीठाचे विहित केल्याप्रमाणेच आवश्यक तेवढ्या विद्यार्थ्यांना बी.पी.एड्. अभ्यासक्रमास प्रवेश देण्यात यावा. तथापि प्रवेश क्षमता १२० विद्यार्थ्यांपेक्षा जास्त नसावी.

२) प्रस्तावित महाविद्यालयाला संलग्नीकरण देण्याच्या संदर्भात विद्यापीठाचे विहित केलेल्या सर्व अटींचे महाविद्यालयाने पालन करावे.

३) याबाबत शासनाकडून प्रस्तावित महाविद्यालयाला कुठल्याही प्रकारचे अनुदान देय होणार नाही.

PRINCIPAL
College of Physical Education
UDGIR Dist Latur

पृ. मा. प.

३. स्थापित चौकशी समिती, अॅकॅडेमिक कौन्सिल, एक्झीक्युटिव्ह कौन्सिल व सिनेट यांचे अहवाल विद्यापीठास प्राप्त झाल्यावर मराठवाडा विद्यापीठाने विद्यापीठ अधिनियम १९७४ मधील कलम ४३(६) व (७) नुसार या महाविद्यालयाच्या अंतिम संलग्नीकरणाचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

४. हे पत्र समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभागाचे संमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

या पत्राची प्रत संबंधित व्यवस्थापकास पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

( गो. वि. साटम )
कार्यासन अधिकारी.

प्रति,

चिटणीस, इंदिरा शिक्षण प्रसारक मंडळ, ~~मु.पो.~~ पाटोदा, ता.उदगीर, जिल्हा लातूर. यांस अग्रेषित.

या संस्थेस शारिरीक शिक्षण ~~हर~~ महाविद्यालय उघडण्यास देण्यात येणारी परवानगी वरील परिच्छेद २ मध्ये नमुद केलेल्या अटीवरच देण्यात आलेली आहे हे कृपया त्यांनी लक्षांत घ्यावे.

प्रत, शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, क्रिडा व युवक सेवा, ~~xxx~~ महाराष्ट्र राज्य, पुणे.
प्रशासन अधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, औरंगाबाद
समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग.(कार्यासन एसवायएस)
निवड नस्ती, विशि-२.

जम/१९.४.८५.